# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग-दोन

**<u>सोमवार, दिनांक १३ मे, २०२४/ वैशाख २३, १९४६ (शके)</u>**

**३४. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की** :-

१) महाराष्ट्र विधानसभेच्या **सोमवार, दिनांक १० जून, २०२४** पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या **सन २०२४ च्या तृतीय (पावसाळी)** अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना **MOIS** या संगणक प्रणालीवर **संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने सोमवार, दिनांक ०३ जून, २०२४** पासून **सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील.

२) महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारुप जास्तीत जास्त १५० ते १७५ शब्दांचे असावे.

३) लक्षवेधी सूचना संपूर्णत: **ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येत असल्याने मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार केवळ ऑनलाईन (online) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्याच लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राहय धरण्यात येतील. ऑफलाईन (offline) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राहय धरण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण **३ दिवस** अगोदरचा दिवस हा **ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना** स्वीकारण्यासाठीचा अंतिम दिवस असेल.

५) लक्षवेधी सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा **मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचाच राहील** याची कृपया नोंद घेण्यात यावी.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : १३ मे, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानसभा

<u>याची प्रत :-</u>

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(५) सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
(८) संगणक कक्ष (Website)
(९) एम.के.सी.एल. कक्ष (MKCL)